MHNS280015062023

<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक १४२/२०२३ मधील निशाणी क्र.३३ वरील आदेश</u>.

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३ ते ५, १०, १२ व १८ यांना वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळण्यासाठी आणि प्रतिवादींची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यास मुदतीत जबाब कैफियत देणे आवश्यक होते. परंतु सदर कैफियत दाखल करण्यासाठी कागदपत्रांची जमवाजमव करण्यासाठी वेळ गेला. त्यामुळे प्रतिवादींना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सदर प्रतिवादींना कैफियत दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने महत्वाचे व गरजेचे असल्याने सदरचा झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती प्रतिवादींनी केलेली आहे. सबब, जबाब कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती वादींनी केली आहे.

२. याउलट वादींतर्फे विद्वान वकीलांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जास आक्षेप नोंदविला व सदरच्या आक्षेपाप्रमाणे त्यांचे म्हणणे असल्याचे नमूद केले.

३. मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता सदर दाव्यात दाखल असलेल्या दाव्यास प्रतिवादींना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोचित ठरेल. प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यास जाणुनबुजून उशिर केलेला नाही असे कथन केले आहे. सदर कथन व वादींचा आक्षेप विचारात घेता माझ्या मते वादींचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये

दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्रमांक ३३ मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांना वादींच्या दाव्यास कैफियत दाखल करणेकामी झालेला विलंब माफ करण्यात येतो. प्रतिवादींनी संयुक्तिकरित्या वादींना खर्च रक्कम रु. २००/— (दोनशे रूपये मात्र) द्यावेत.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SACHIN HINDURAO KHADE

Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2025.11.11 16:08:43 +0530

(सचिन एच. खाडे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
सिन्नर

दिनांक :— ११/११/२०२५.